PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Mala Aai Whaychay
Year: 2011

Song: Tujh Majhyashi Naat he
Lyricist: Samruddhi Pore

तुझं माझ्याशी नातं हे
असं कसं आहे
कोण कोठला रे तू
तुझी कोण मी आहे
तुझं माझ्याशी नातं हे
असं कसं आहे
कोण कोठला रे तू
तुझी कोण मी आहे
गतजन्मीचे नाते हे
नक्की काय आहे
ना ठाव मला
ना ठाव तुला
ना ठाव मला
ना ठाव तुला
या झोपडीत माझ्या
हाताचा पाळणा
आकाशी छताला
चंद्राचा खेळणा
डुलूडुलू हाले
मऊ मांडीचा बिछाना
पदरात फाटक्या
माया ही माइना
एकही श्वास तुझ्याविन जाईना
गतजन्मीचे नाते हे
नक्की काय आहे
ना ठाव मला
ना ठाव मला
ओ ना ठाव तुला
मी तुझं पिल्लू गं
तू माझी चिमणी
मी तुझं रोपटं
तू माझी धरणी
मी मातीचा गोळा गं
तू माझा कुंभार
तुझ्या रूपाने देवच आला
बनून पालनहार
दिलास पहिला श्वास
पहिला तूच भरविला घास
दुडदुडणारे पाऊल पहिले
आणि बोबडे बोल
गोष्ट परीची
ऐकून उमलले हासू
मज भूक लागता
प्रेमाचा फुटतो पान्हा
ह्यालाच कदाचित
आई म्हणतात ना गं
गतजन्मीचे नाते हे
नक्की काय आहे
हे ठाव मला
हे ठाव तुला
हे ठाव मला
हे ठाव तुला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*